# विठ्ठलवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ४३ /२०२५ दि. २०/०३/२०२५

## 'वाहतूक नियंत्रण अधिसूचना'

**ज्याअर्थी,** विठ्ठलवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत अमृत योजना अंतर्गत भुयारी गटाराचे काम पुनम हॉटेल पासुन ते पेन्सील फॅक्टरी रोड, उल्हासनगर – ४ येथ पर्यंत करण्यात येणार असुन सदर सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) श्रीराम चौकाकडुन व्हिटीसी रोडकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पेन्सील फॅक्टरी ( विद्युत ट्रान्सफार्मर)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने ही श्रीराम चौक, एनसीटी स्कुल ओटी नबंर ४ मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) आशेळेपाडा मार्गे व्हिटीसी रोड मार्गे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आरती हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने ही हुतात्मा चौक ( अमरजवान चौक) मार्गे येथुन उजवीकडे वळण घेवुन शासकीय हॉस्पीटल मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ३) बंजारा कॉलनी कडुन येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पेन्सील फॅक्टरी रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने डालसन कंपनी येथुन व्हिटीसी रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ४) इसरदास दरबार रोड, ठाणे मध्यवर्ती बॅंक मार्गे व्हिटीसी रोडकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **चायनिज कॉर्नर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने ही उल्हासनगर – ४ मेन मार्केट मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदर अधिसचना दिनांक १७/०३/२०२५ ते काम संपेपावेतो लागु करण्यात येत आहे. या संदर्भातील यापुर्वीच्या सर्व अधिसुचना या अधिसुचनेद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहेत. या कालावधीत काही सुचना/आक्षेप असल्यास लेखी स्वरूपात पोलीस उप आयुक्त, वाहतुक नियंत्रण विभाग, तीन हात नाका, एल.बी.एस.रोड ठाणे (प.) येथे कळवावे.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.

मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मुख्याधिकारी, अंबरनाथ नगर परिषद.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.

२/– म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner

# कामाच्या ठिकाणाचा नकाशा

